**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ चा जबाब</u>**

साक्षीदाराचे नावः– **श्रीमंत खंडु हजारे,**

वयः– ५२ वर्षे, व्यवसायः– मजुरी,

राहणारः– रामलिंग मुदगड ता. निलंगा जि. लातुर

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकरी विधीज्ञ श्री. व्ही. एन. मेहेत्रे यांचेमार्फत शपथेवर सुरुः–</u>**

**०१.** सुवर्णा ही माझी मुलगी आहे. तिन वर्षापुर्वी सायं. ८.०० च्या सुमारास रामलिंग मुदगड येथे माझ्या घरी घटना घडली होती. आरोपी क्र.१ ते ४ माझ्या घरात घुसले. त्यांनी आशा चे केस धरून तिचे डोके भिंतीवर आपटले. त्यांनी मागील भांडणाची कुरापत काढुन माझ्या मुलीला मारहाण केली होती. आरोपी क्र. २ ने बुटाने माझी पत्नी छायाच्या डाव्या डोळयावर मारहाण केली. आरोपी क्र. ३ ने माझ्या पोटात गुडघा मारून मारहाण केली. मला घराबाहेर ढकलुन दिले. माझी मुलगी सुवर्णा हिला आरोपी क्र. ४ गुंडेराव याने केस धरून गालावर चापटीने मारले. माझी मुलगी कल्पना हिला आरोपी क्र. ४ गुंडेराव याने गालावर चापटीने मारले. सुभाष माळी, महादेव वाकडे यांनी भांडणे सोडवली. त्यानंतर आम्ही कासारसीरसी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार देण्यासाठी गेलो होतो. माझ्या मुलीने सदर घटनेची तक्रार दिली. मी आरोपी क्र. १ ते ४ यांना ओळखतो. ते आज रोजी न्यायालयात हजर आहेत.

<u>**उलटतपास आरोपीतर्फे** ॲड **एच.व्ही. गायकवाड यांच्यामार्फत सुरुः–**</u>

०२. सायं. ८.०० च्या सुमारास आरोपी क्र.१ ते ४ माझ्या घरात घुसले, त्यांनी आशा चे केस धरून तिचे डोके भिंतीवर आपटले हे मी पोलिसांना जबाब देताना सांगितले होते. तो मजकुर माझ्या जबाबात

लिहलेला नाही. तो का लिहलेला नाही याचे कारण मला सांगता येत नाही. आरोपी क्र. ३ ने माझ्या पोटात गुडघा मारून मारहाण केली हे मी पोलिसांना जबाब देताना सांगितले होते. तो मजकुर माझ्या जबाबात लिहलेला नाही. तो का लिहलेला नाही याचे कारण मला सांगता येत नाही. माझी मुलगी कल्पना हिला आरोपी क्र. ४ गुंडेराव याने गालावर चापटीने मारले हे मी पोलिसांना जबाब देताना सांगितले होते. तो मजकुर माझ्या जबाबात लिहलेला नाही. तो का लिहलेला नाही याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटना संध्याकाळी ८.०० वाजता घडली असे मी खोटे सांगत आहे. आमच्यातील झालेला घटनेपुर्वीचा वाद मिटवण्यासाठी गावामध्ये देवु गोरे यांच्या समोर मिटींग झाली नव्हती. साक्षीदार सांगतो की प्रस्तुत घटना घडल्यानंतर देवु गोरे तक्रार करून नका असे सांगण्यासाठी आले होते. घटनेच्या दिवशी आम्ही फिर्याद दिली. घटनेच्या दिवशी रात्री १० वाजता मी, माझ्या मुली व पत्नी पोलिस स्टेशनला गेलो होतो. त्यावेळेस आम्ही दवाखाण्यात गेलो त्यावेळी घाईघाईत पोलिस स्टेशनमध्ये अर्ज दिला नाही. पोलिसांची गाडी घटनेच्या दिवशी रात्री ८.३० च्या सुमारास गावात आली होती. पोलिसांना आम्ही बोलावले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी १०.०० वाजता मी, सुवर्णा पोलिस स्टेशनमध्ये गेलो होतो. तेथे १० ते १५ मिनीटे होतो. त्यानंतर घरी आलो. घरी येण्यासाठी १ तास वेळ लागला. घरी आम्ही पोलिसांच्या सोबत आलो नाही. घटनेच्या दुसऱ्या दिवशी आम्ही घरी पोहचल्यानंतर पोलिस आले होते. पोलिसांनी पंचनामा लिहीला. आमचे फाटलेले कपडे पाहिले परंतु ते जप्त केले नाहीत. घटना ठिकाणी दुसऱ्या दिवशी रक्त पडल्याचे दिसले नाही. घटनेच्या वेळी

जमीनीवर रक्त पडले होते. घटना ठिकाणी फरशी नव्हती. माझ्या पत्नीचे कपडयांवर रक्त पडले नव्हते. पत्नीला येणारे रक्त थांबण्यासाठी कपडा लावला होता. तो कपडा पोलिसांनी जप्त केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीला रक्त निघाले नव्हते.

०३. आरोपी आणि आमच्यामध्ये फरशीच्या पैशावरून भांडणे होते. आरोपी नं. १ मला तिन हजार रूपये देणे होता. त्या पैशावरून घटनेच्या पुर्वी आदल्या दिवशी माझा भाऊ बाबु गवळी सोबत माझा वाद झाला होता. तेंव्हा मला आरोपी क्र. १ ते ४ यांनी मला पोटात, पाटीत, डोक्यात लाथा घालुन मारहाण केली होती. त्याबद्दल मी तक्रार केली नव्हती. मी आदल्या दिवशी डॉक्टरांना दाखविले नव्हते.दुसऱ्या दिवशी डॉक्टरांच्याकडे उपचार घेतले होते. साक्षीदार आत सांगतो ती घटना आदल्या दिवशी नाही तर मुख्य घटनेच्या दिवशी सकाळी घडली होती. तो वाद मिटला नव्हता. सकाळी घडलेली घटना रस्त्यावर घडली होती घरात घडली नव्हती. आरोपी क्र. १ ते ४ सकाळी ११.०० वाजता घरात घुसले आणि मुलींना मारहाण केली असे घडले नव्हते. दि.०७/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मी घरी होतो. तेंव्हा आरोपी माझ्या घरात आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आमच्या घरात घुसले आणि मारहाण केली असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ ने बुटाने माझी पत्नी छायाच्या डाव्या डोळयावर मारहाण केली असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. ३ ने माझ्या पोटात गुडघा मारून मारहाण केली असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी मुलगी सुवर्णा हिला आरोपी क्र. ४ गुंडेराव याने केस धरून

गालावर चापटीने मारले असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी मुलगी कल्पना हिला आरोपी क्र. ४ गुंडेराव याने गालावर चापटीने मारले असे मी खोटे सांगत आहे. आरोपी क्र. १ च्या वडीलांनी माझ्याकडुन पैसे घेतले नव्हते. बाबु गवळी यांनी माझ्याकडुन पैसे व फरशी घेतली होती. साधु हे बाबुचे वडील आहेत. भांडणावेळी बाबु होता. सकाळी झालेल्या भांडणावेळी बाबुने मला मारहाण केली होती. बाबुसोबत माझा पैशावरून वाद झाला होता. मी त्याला दहा वर्षापुर्वी पैसे दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, बाबु पैसे देवु शकत नाही म्हणुन दिगंबर आणि इतर आरोपीच्या विरूध्द आम्ही खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ते ४ सोबत माझा पैशाचा संबंध नव्हता.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत.**

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.06.25 16:48:23 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक २५/०६/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,
निलंगा